अंतिम निवाडा अर्ज नं. १/२०२१
(मायकेल डिसोजा वगैरे –अर्जदार विरुध्द बॅनित डिसोजा वगैरे – सामनेवाला )
नि. २० खालील आदेश

१. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी रे. दि. मु. नं. ११५/२०१० मधील हुकुमनाम्याप्रमाणे घर मिळकत नंबर ४९०–ब या इमल्याचे वाटप करणेसाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून अॅड श्री. संजय यशवंत रानडे यांची नेमणुक करण्यासाठी दिलेला आहे.

२. सामनेवाला क्र.१अ यांनी प्रस्तुत अर्जावर नि. २४ कडे आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाला यांचे कथन की अर्जात नमुद इमल्याची वस्तुस्थिती शाबीत करण्याची जबाबदारी ही अर्जदार यांची आहे. वकीलांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक केल्यास त्यांना त्या संदर्भातील पुरेसे ज्ञान असण्याची शक्यता कमी आहे. रे. दि. मु. नं. ११५/२०१० चे कामी मे. कोर्टाने कोणताही अंतिम हुकुमनामा पारीत केलेला नाही. तसेच कायद्याने अनिवार्य असलेल्या जरुर त्या मुद्रांक शुल्काच्या पेपरवर उठावाचे काम करुन झालेला नसल्यामुळे प्रस्तुत फायनल डीक्री अर्जाद्वारे अर्जदार यांना दावा इमल्याचा पृथक कब्जा मिळणार नाही. तरी अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती सामनेवाला क्र. १अ यांनी केली आहे.

३. सदरचा मुळ अर्ज हा अर्जदार यांनी नियमित दिवाणी मुकदमा क्र . ११५/२०१० मधील प्राथमिक हुकुमनाम्याचे अंतिम हुकुमनाम्यात रुपांतर होण्यासाठी दाखल केला आहे. मौजे ओरोस बुद्रुक येथील इमला नं. ४९०–अ व ४९०–ब मधील अर्जदार नं.१ चा १/३ हिस्सा त्याच्या लगत करण्यात आलेल्या बांधकामासहित त्याच्या हिश्श्यात व अर्जदार नं.२ ते ४ आणि सामनेवाला नं. ३ यांच्या एकत्रित १/३ हिश्श्यात येणा–या घराचे क्षेत्र नेमुन देणे, वाटप करुन त्यांच्या ताब्यात देण्यासाठी न्यायालयीन आयुक्तांकडून प्रत्यक्ष जागेवर जावून पहाणी करुन सुचविले जाणे आवश्यक आहे. सदरचे काम हे विधिज्ञ करु शकतात. तसेच विधिज्ञ यांना प्रत्यक्ष जागेवर गेल्यानंतर तेथील परिस्थिती पाहिल्यानंतर जर त्याठिकाणी वाटप सुचविता येणार नाही असा त्यांचा अहवाल आल्यास सामनेवाला यांनी घेतलेली

हरकत विचाराधीन घेणे न्यायोचित होणार आहे. दाव्यामध्ये केवळ घराचे वाटप सुचविण्याचे काम असल्यामुळे सामनेवाला यांनी घेतलेली हरकत ही न्यायोचित दिसून येत नाही.

४. सबब वरील सर्व बाबींचा विचार करता अर्जदार यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे दावा इमल्याचे वाटप सुचविण्याकरीता ॲड श्री . संजय यशवंत रानडे यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करणे आवश्यक असल्याचे दिसून येते . त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## –आदेश –

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. ॲड श्री. संजय यशवंत रानडे यांनी न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

३. न्यायालयीन आयुक्त यांनी नियमित दिवाणी मुकदमा क्र. ११५/२०१० मधील प्राथमिक हुकुमनाम्याप्रमाणे मौजे ओरोस बुद्रुक येथील इमला नं. ४९०–ब या इमल्याचे अर्जदार व सामनेवाला यांच्या हिश्श्यानुसार वाटप सुचवावे व तसा नकाशासह अहवाल सादर करावा.

४. ॲड श्री. संजय यशवंत रानडे यांचे नांवाने आयोगपत्र काढण्यात यावे.

५. अर्जदार यांनी रक्कम रुपये ५,०००/–(रक्कम रुपये पाच हजार मात्र ) न्यायालयीन आयुक्तांची फी म्हणून न्यायालयात जमा करावी . तसेच पहाणीसाठी आवश्यक असणारे सर्व कागदपत्र न्यायालयीन आयुक्त यांना द्यावेत.

सही/–
(अ. जो.बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ .

ठिकाण : कुडाळ.
दि. ०९/०१/२०२४